।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | गुरूवार दि १७ सप्टेंबर २०२६ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३७ वा

ढोल-ताशांच्या निनादात सांगोला शहरासह तालुक्यात गणरायाचे जल्लोषात आगमन

भारत गल्ली गणेश मंडळाची मुंबईची मनमोहक रूपातील सुबक गणेश मुर्ती

सांगोला : ढोल-ताशांचा निनाद, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष, गुलालाची उधळण आणि उत्साहाने भारलेले वातावरण अशा भक्तिमय वातावरणात सांगोला शहरासह तालुक्यात गणरायाचे जल्लोषात आगमन झाले. सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात गणेशमूर्तींचे स्वागत करून विविध ठिकाणी विधिवत प्रतिष्ठापना केली.

गणरायाच्या आगमनाने शहरातील विविध भाग भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून सार्वजनिक गणेश मंडळांची जोरदार तयारी सुरू होती. मंडप उभारणी, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई तसेच विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजन मंडळांकडून करण्यात आले होते. गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशमूर्तींचे आगमन होताच शहरातील वातावरणात मोठे चैतन्य निर्माण झाले.

सांगोला शहरातील अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी कोल्हापूर, पुणे, मुंबई, सांगली, इचलकरंजी आदी शहरांमधून गणेशमूर्ती आणल्या.

२६० मंडळांना ऑनलाइन परवानगी यंदाच्या गणेशोत्सवासाठी सांगोला तालुक्यात आतापर्यंत एकूण २६० गणेश मंडळांना ऑनलाइन परवानगी देण्यात आली आहे. यामध्ये सांगोला शहरातील ६०, तर तालुक्यातील २०० मंडळांचा समावेश आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सलोखा वाढावा, यासाठी सांगोला तालुक्यात १५ ठीकाणी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्यात येत आहे.त्याच प्रमाणे ऑनलाइन परवानगीच्या प्रक्रियेत मागील दोन दिवसांपासून काही तांत्रिक अडचणी येत असल्याने अनेक मंडळांकडून अद्याप ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे परवानगी मिळालेल्या मंडळांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. घेऊन येणाऱ्या वाहनांसोबत मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी आणि गणरायाच्या जयघोषात मूर्तींचे स्वागत करण्यात आले.

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, भारत गल्ली, वज्राबाद पेठ, लोहार गल्ली, धनगर गल्ली, शिवाजीनगर, शनि गल्ली, परीट गल्ली, कुंभार गल्ली, इंदिरानगर, संजय नक्षर, गोंधळ गल्ली, महादेव गल्ली, कोष्टी गल्ली, मेन रोड, राऊत मळा, पुजारवाडी, मस्के कॉलनी आदी प्रमुख भागांतील सार्वजनिक गणेश मंडळांनी यंदाच्या उत्सवासाठी आकर्षक व देखण्या गणेशमूर्ती आणल्या आहेत. विविध मंडळांच्या गणेशमूर्तींच्या आगमनावेळी कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

काही मंडळांनी पारंपरिक स्वरूपातील गणेशमूर्तींना पसंती दिली असून, काही मंडळांनी आकर्षक व कलात्मक मूर्तींची निवड केली आहे. मूर्तींच्या स्वागतासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांनी परिसरात आकर्षक सजावट केली आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख गल्लीमध्ये गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे.

गणेशमूर्तींच्या आगमनामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर तसेच विविध चौकांमध्ये नागरिक व भाविकांची मोठी गर्दी झाली होती. गणरायाच्या दर्शनासाठी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर आले होते. अनेक ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात तर काही ठिकाणी पारंपरिक वाद्यांच्या निनादात गणरायाचे स्वागत करण्यात आले.

मंडपात गणेशमूर्तींचे आगमन झाल्यानंतर मंडळांच्या वतीने धार्मिक विधी, पूजा-अर्चा व आरती करून विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. अनेक मंडळांमध्ये रात्री उशिरापर्यंत प्रतिष्ठापना सोहळे सुरू होते. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहरातील विविध परिसर दुमदुमून गेला होता.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच गणेशमूर्तींच्या आगमनावेळी गर्दीचे योग्य नियोजन व्हावे, यासाठी पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शहरातील गर्दीची ठिकाणे, प्रमुख चौक तसेच गणेशमूर्ती आगमनाच्या मार्गांवर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सांगोला शहरातील जुन्या मंडळापैकी असलेल्या भारत गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मित्रमंडळ यांची ही १५ फुट उंचीची सुबक राजाच्या रूपातील सिंहासनावर बसलेली गणेश मुर्ती असून मंडळाचे यंदाचे ६२ वे वर्ष असून सांगोल्यात मुंबईहुन मोठया व उंच मुर्ती आणण्याची सुरूवात या मंडळाने केली आहे.मुंबई हून मुर्ती आणण्याची मंडळाची परंपरा आहे.मुर्तीकार ओंकार परब,लालबाग,मुंबई.

बौद्धिक विकासाबरोबरच संस्कार आणि नैतिकतेची जपणूक करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हेच गुरुवर्य बापूसाहेबांच्या शिक्षणप्रसाराचे मुख्य ध्येय-युवराज पाटील

सांगोला : बौद्धिक विकासाबरोबरच संस्कार आणि नैतिकतेची जपणूक करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हेच गुरुवर्य बापूसाहेबांच्या शिक्षणप्रसाराचे मुख्य ध्येय होते. मूल्यधिष्ठित शिक्षण, संस्कार आणि नैतिकता हाच गुरुवर्य बापूसाहेबांचा खरा वारसा असून आजच्या काळात त्याची नितांत आवश्यकता आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते युवराज पाटील यांनी केले.

सांगोला विद्यामंदिरच्या प्रांगणात सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य चंद्रशेखर विश्वनाथ तथा बापूसाहेब झपके यांच्या ४५ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित सांगता समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास यांनी ४५ वा स्मृतीसमारोह त्यानिमित्त घेतलेले विविध कार्यक्रम व सांगता समारंभ याची माहिती देत सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ ही आणि समाजोपयोगी कार्यक्रमातून अमृत महोत्सवी वर्ष समृद्धपणे साजरे करणार आहोत असे सांगत कार्यक्रमाचा हेतू सांगितला व उपस्थितांचे स्वागत केले यानंतर पुढे बोलताना प्रमुख पाहुणे युवराज पाटील यांनी बापूसाहेबांच्या कार्याचा आणि विचारांचा अतिशय प्रभावी शब्दांत वेध घेतला. गुरुवर्य बापूसाहेबांनी संस्कारांतून केलेली नैतिकतेची जपणूक, बौद्धिक विकासासोबतच मूल्यांची घातलेली सांगड, राष्ट्र ध्वजाला सलामी देताना डबडबलेले त्यांचे डोळे आणि साने गुरुजींच्या सान्निध्यातून घेतलेली मूल्यांची शिकवण यांसारख्या विविध पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. अभय बंग आणि अंतराळवीर कल्पना चावला यांसारख्या उत्तुंग कार्य करणाऱ्या महापुरुषांची व ध्येयवेड्या व्यक्तींची प्रेरणादायी उदाहरणे देत, स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी कष्टाचे सातत्य, संकटांना पायाखाली घेण्याची वृत्ती आणि अपयश पचवण्याचे सामर्थ्य विकसित करण्याचे आवाहन केले. 'सर्वसामान्यांच्या पोरांना गमवायला शून्य, तर कमवायला अख्खं जग आहे; त्यामुळे मन, मेंदू आणि मनगट ताब्यात ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास कर्तृत्व सिद्धव्हायला वेळ लागत नाही', असा धारदार कानमंत्र दिला.

जगन्नाथ साठे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा.धनाजी चव्हाण यांनी 'कै. बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार' निवड प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली.त्यानुसार कै.गुरूवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार भागवत भाटेकर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेळकेवाडी यांना पत्नी पोळ मॅडम यांचेसमवेत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, 'सांगोल्याचे बापूजी' चरित्र ग्रंथ व रोख रुपये देऊन प्रदान करण्यात आला. सत्कारानंतर मनोगत व्यक्त करताना भागवत भाटेकर म्हणाले हा सन्मान माझ्यासाठी केवळ पुरस्कार नसून, माझ्या शिक्षक म्हणून केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणाची मनःपूर्वक दखल आहे. विशेष म्हणजे मी या शाळेचा विद्यार्थी आहे त्यामुळे हा सन्मान माझ्या कार्याला नवी ऊर्जा आणि अधिक जबाबदारीची जाणीव देणारा आहे.

यानंतर संस्थांतर्गत गुणवंत शिक्षक पुरस्कार सांगोला विद्यामंदिर प्रशाला मंगेश बबनराव म्हमाणे,सिताराम मारुती राऊत, ज्युनिअर कॉलेज प्रा.डी.के.पाटील, कोळा विद्यामंदिरचे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोळा काकासाहेब तुकाराम पांढरे,नाझरा विद्यामंदिर प्रशाला ज्युनियर कॉलेज नाझरा रावसाहेब गोरख बंडगर, सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालय अविनाश विठ्ठल दिघे, इंग्लिश मेडियम स्कूलचे संगमेश्वर वैजीनाथ घोंगडे यांना प्रदान करण्यात आला. तसेच सांगोला विद्यामंदिरचे चांगदेव दिलीप कुंभार यांना गुणवंत लिपिक व मोहसीन शब्बीर मुजावर यांना गुणवंत सेवक पुरस्काराने सहकुटुंब सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, कार्यकारिणी सदस्य प्रफुल्लचंद्र झपके, चंद्रशेखर अंकलगी,दिगंबर जगताप,शीलाकाकी झपके,विश्वेश झपके,प्रसाद झपके, संस्था सदस्य राजश्री झपके,अंजली झपके,झपके कुटुंबीय सांगोल्यातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, विद्यामंदिर परिवारातील सर्व आजी-माजी प्रशासकीय अधिकारी, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन उन्मेश आटपाडीकर यांनी केले, तर आभार प्राचार्य चारूदत्त जगताप यांनी मानले.

मुक्त विचार

विचारधन

उत्सव आनंदाचा, उत्सव मांगल्याचा ! बुद्धीची देवता असलेल्या बाप्पाच्या चरणी लीन होऊन, चला समृद्ध विचारांची कास धरूया.

गणेशोत्सव – कौटुंबिक जीवनमूल्यांचा दीपस्तंभ

गणेशोत्सव हा फक्त पूजा-अर्चेपुरता मर्यादित नसून तो सामाजिक एकोप्याचा, कौटुंबिक ऐक्याचा आणि संस्कृतीच्या पुनर्जागराचा मोठा उत्सव आहे. हा उत्सव प्रत्येक पिढीला नव्या उमेदीने एकत्र आणतो.कोकणातील गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक पुनर्जन्माचा सोहळा आहे. समुद्रकिनारी उसळणार्या लाटा, डोंगररांगेत दडलेलं मंद धुकं, हिरव्यागार बागा आणि नारळी-पोफळीच्या सुगंधात न्हालेलं वातावरण, या सगळ्याच्या मध्यभागी उभा असतो गणपती बाप्पांचा उत्सव. हा फक्त धार्मिक सोहळा नसून तो एक सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक पर्व मानला जातो. या उत्सवाच्या काळात संपूर्ण कोकण प्रदेश जणू नव्या उत्साहाने उजळून निघतो.

गणेशोत्सवाच्या दिवसांत शहरातल्या धावपळीच्या जीवनातून प्रत्येक कोकणकरांची पावलं आपल्या मुळांकडे धावत सुटतात. दरवर्षी हजारो कोकणी मंडळी, मग ती मुंबई, पुणे, ठाणे किंवा देशाच्या कोणत्याही भागात असोत, आपल्या गावी परत येतात. हा प्रवास इतका महत्त्वाचा मानला जातो की, कितीही मोठा नोकरदार, व्यापारी किंवा उद्योजक असला तरी गणपतीच्या दर्शनासाठी तो आपल्या मूळ गावी परतण्याचा प्रयत्न करतो. मुंबई, पुणे किंवा परदेशातील गगनचुंबी इमारतींत राहणारा माणूसही या दिवसांत गावी परततो. सरकार आणि राजकीय पक्ष या भावनेचा सन्मान म्हणून विशेष गाड्या सोडतात. रेल्वे, बस यामध्ये प्रचंड गर्दी होत असली तरी प्रत्येकाला गावच्या गणपतीला भेट देण्याची आस असते.

काही दिवसांपासून घर बंद असल्याने गावी पोहचताच घरची साफसफाई उत्साहात सुरु होते. शिक्षण, पैसा, पदवी यांचं गर्विष्ठ ओझं दाराबाहेर ठेवून प्रत्येक जण झाडू, पाणी आणि चुन्याचा डबा हातात घेतो. मातीचा गंध, तुळशी वृंदावन आणि सजलेल्या देवघरातील गणपती ही दृश्यं मनाला एक वेगळीच शांती देतात.

गणेशोत्सवाच्या काळात घराघरांत एकच आनंद, एकच वातावरण आणि एकच स्वयंपाकघर असते. मोदक वाफाळायला लागले की त्याचा गंध अंगणभर पसरतो. कुटुंबामध्ये सर्वजण आपापल्या जबाबदार्या नीट विभागून घेतात. कुणी स्वयंपाक करतो, कुणी भाजी आणतो, कुणी सजावट करतो, तर कुणी पाहुण्यांची सेवा करतो. कुणी भाजी चिरतो, कुणी नैवेद्यासाठी मिठाई करतो, कुणी दुर्वांची जुडी / हार तयार करतो तर कुणी घर सजवतो. प्रत्येकाच्या डोळ्यांत एकाच उद्दिष्टाचा प्रकाश दिसतो – आपल्या बाप्पाचं स्वागत! या कामांच्या वाटपात कौटुंबिक ऐक्याची आणि शिस्तीची उत्तम जाणीव होते.

संध्याकाळी गावातील वाडीवाडीत सुखकर्ता दु:खहर्ताच्या गजराने दुमदुमतात. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगांचा नाद आणि झेंड्यांनी सजलेल्या रस्त्यांवर उभं असलेलं गाव हे दृश्य जणू एकात्मतेचं मूर्त स्वरूप असतं. कोकणात एकमेकांच्या घरी आरतीस जाण्याची परंपरा अजूनही टिकून आहे. यामुळे गावातील म्हातारी मंडळी आणि शहरात राहणारी तरुण पिढी यांची भेट होते. वृद्ध मंडळींना आपल्या नातलगांशी गप्पा मारण्याची संधी मिळते, तर तरुणाईला त्यांच्या अनुभवातून शिकण्याचा लाभ मिळतो. त्यामुळे कुटुंबातील नातेसंबंध दृढ होतात आणि वृद्धांच्या एकटेपणा दूर होतो. ही परंपरा गावातील नातेसंबंधांना नवं जीवन देते. वयोवृद्ध मंडळी संस्कृतीचा वारसा पुढल्या पिढीकडे सोपावतात.

या सणातून मुलांना केवळ ईश्वरभक्ती शिकवली जात नाही, तर जीवनमूल्यांचं अधिष्ठान दिलं जातं. एकत्र राहण्याची ताकद, परंपरेचा अभिमान, मोठ्यांचा आदर, चांगलं-वाईट याचा विवेक, ही सगळी शिदोरी त्यांना इथेच मिळते. म्हणूनच ही पिढी सहजासहजी परकीय प्रभावाला बळी पडत नाही. या सर्व प्रक्रियेत मुलांवरही विशेष परिणाम होतो. त्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि कौटुंबिक मूल्यांची जाणीव होते. एकत्रित राहणे, वाटून खाणे, मोठ्यांचा आदर करणे, परंपरांचा सन्मान करणे, ही शिकवण प्रत्यक्ष अनुभवातून त्यांना मिळते. त्यामुळे त्यांच्यात चांगले-वाईट याचा विवेक निर्माण होतो आणि ते चुकीच्या मार्गाचे बळी पडत नाहीत.

एकूणच कोकणातील गणेशोत्सव हा फक्त पूजा-अर्चेपुरता मर्यादित नसून तो सामाजिक एकोप्याचा, कौटुंबिक ऐक्याचा आणि संस्कृतीच्या पुनर्जागराचा मोठा उत्सव आहे. हा उत्सव प्रत्येक पिढीला नव्या उमेदीने एकत्र आणतो आणि गणपती बाप्पा मोरयाच्या हाच जयघोष कोकणातील दर्या-डोंगरही उत्साहाने दुमदुमून काढतो.

खरं पाहता, कोकणातील गणेशोत्सव हा फक्त दहा दिवसांचा सण नाही. तो आहे आपल्या संस्कृतीचा आत्मा, आपल्या एकोप्याचा द्योतक आणि आपल्या अस्तित्वाची ओळख. डोंगर-दर्यातून घुमणारा गणपती बाप्पा मोरया! जयघोष ही फक्त भक्तीची आरोळी नसून, तो आहे कोकणच्या मातीतल्या प्रत्येक श्वासाचा, प्रत्येक ठोक्याचा, प्रत्येक नात्याचा प्रतिध्वनी.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात गणेशोत्सव हा धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकात्मता, आर्थिक घडामोडी, संस्कृतीसंवर्धन आणि राष्ट्रीय जाणीव यांचे एकत्रित प्रतीक मानला जातो. गणेशोत्सव हा आपल्या जीवनातील आनंद, भक्ती आणि सामाजिक ऐक्याचा महत्त्वपूर्ण उत्सव आहे. समाजाला एकत्र आणण्याची, अर्थव्यवस्था गतिमान करण्याची आणि सांस्कृतिक परंपरेला नवी ऊर्जा देण्याची ताकद या उत्सवात आहे.भारतीय परंपरेनुसार कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी श्रीगणेशा करणे ही रूढी आहे. विवाहसोहळा असो, गृहप्रवेश असो, धार्मिक अनुष्ठान असो किंवा एखादे शैक्षणिक / व्यावसायिक कार्य असो, प्रथम सर्वत्र गणेशाची पूजा केली जाते. यामागील भावार्थ असा की, गणरायाची कृपा असल्यास कार्यात अडथळे येत नाहीत, मनाची एकाग्रता वाढते आणि यश प्राप्त होते. म्हणूनच गणेशोत्सवाला धार्मिक महत्त्वाबरोबरच आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्येही लाभली आहेत.

भारतीय कुटुंबसंस्था ही समाजाचा मूलभूत घटक आहे. गणेशोत्सव हा त्या संस्थेला अधिक बळकट करणारा उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात गणेशोत्सव आपल्याला कुटुंबासोबत वेळ घालवायला आणि समाजाशी जोडून घ्यायला शिकवतो. घरगुती गणेशोत्सवात सर्व वयोगट एकत्र सहभागी होतात. गणेशोत्सवाचा पहिला आणि सर्वाधिक थेट परिणाम म्हणजे कुटुंबसंस्था बळकट होणे. घराघरांत मूर्ती आणणे, पूजा करणे, नैवेद्य तयार करणे, आरत्या म्हणणे, या सगळ्या कृतींमध्ये संपूर्ण कुटुंब सामील होते.

आजच्या धावपळीच्या जीवनात एकत्र बसून पूजा करणे, मुलांना संस्कार शिकवणे, वडीलधार्यांचा आदर राखणे हे दुर्मीळ झाले आहे. गणेशोत्सव त्या दरीला भरून काढतो. उत्सवाच्या तयारीतून जबाबदारीची जाणीव, सहकार्य, आपुलकी आणि कृतज्ञता या मूल्यांचा संस्कार होतो. अशा रीतीने गणेशोत्सव हा कुटुंबातील प्रेम, ऐक्य आणि परस्परसंवाद वाढवणारा एक महत्त्वपूर्ण सोहळा होतो. कामांचे हे वाटप केवळ घरातील जबाबदार्या सुलभ करत नाही तर कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये परस्परविश्वास, सौहार्द आणि आपुलकी वाढवते. कुटुंब म्हणजे फक्त एकत्र राहणारे लोक नसून एकमेकांना पूरक ठरणारी संस्था आहे, हे गणेशोत्सव दाखवतो.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून तो समाजजीवन, कुटुंबजीवन आणि संस्कारांची शाळा आहे. या सणात घरातील प्रत्येक जण आपापल्या परीने योगदान देतो. त्यातून मुलांना आयुष्यभर उपयोगी पडतील असे मौल्यवान धडे मिळतात.

गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीतील सर्वात प्रिय सण मानला जातो. हा सण फक्त दहा दिवसांचा असला तरी त्याची तयारी काही आठवड्यांपूर्वी पासूनच सुरू होते. घराघरांत आनंदाचे वातावरण असत. अशा प्रकारे, गणेशोत्सव हा फक्त देवपूजेचा सण राहत नाही, तर तो मुलामुलींना जीवनातील मोलाचे संस्कार देणारी शाळा ठरतो. परंपरेचे जतन, कुटुंबातील एकोपा, समाजातील सहकार्य आणि सर्वांगीण उन्नतीचा धडा हा सण आपल्या प्रत्येकाला शिकवतो. त्यामुळेच गणेशोत्सव हा खर्या अर्थाने आपल्याला जीवनमूल्यांची दिशा दाखवणारा दीपस्तंभ ठरतो.

विसर्जनाची परंपरा नश्वरतेचे तत्त्व शिकवते. जीवनातील सर्व गोष्टी क्षणभंगुर आहेत, हे या प्रक्रियेतून अधोरेखित होते. गणेशोत्सव हा फक्त धार्मिक सोहळा नाही, तर तो भारतीय समाजाच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि आध्यात्मिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. दहा दिवस चालणारा हा उत्सव आपल्या जीवनाला भक्ती, आनंद, सामाजिक ऐक्य आणि आर्थिक गती देतो. तरीही, हा उत्सव नेमके दहा दिवसांत संपवला जातो, यामागे सनातन धर्माची खोल तत्त्वज्ञानपर परंपरा दडलेली आहे. सनातन धर्म सांगतो की, ज्याची सुरुवात होते त्याचा अंत होतो. जीवन, उत्सव, आनंद किंवा दुःख काहीही कायमचे नसते. गणेशोत्सवही या तत्त्वज्ञानाला अनुसरतो. दहा दिवसांच्या भक्तीनंतर मूर्तीचे विसर्जन केले जाते, ज्यातून आपल्याला जगातील क्षणभंगुरतेची आठवण करून दिली जाते. यामुळे मनुष्य अहंकारापासून दूर राहून जीवनाला अधिक अर्थपूर्ण बनवतो. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट ठरतो हा संदेशही गणेशोत्सवाच्या कालमर्यादेतून दिला जातो. आनंद आणि भक्तीची गोडी तेव्हाच टिकते जेव्हा त्यात प्रमाण आणि मर्यादा असतात. जर उत्सव अखंड चालू राहिला, तर त्याची पवित्रता आणि उत्साह कमी होऊ शकतो. म्हणूनच दहा दिवसांचा उत्सव संपल्यानंतर मनुष्य पुन्हा दैनंदिन जीवनाकडे परततो आणि त्या स्मृतींना मनात साठवून पुढच्या वर्षाची आतुरतेने वाट पाहतो. अतिरेक कधीही हितकारक नसतो. म्हणूनच गणेशोत्सव मर्यादित काळापुरता असतो. उत्सव मर्यादित असेल तरच त्याची पवित्रता आणि उत्साह टिकतो. अन्यथा, आनंदही ओझं बनू शकतो. विसर्जनानंतरचा विरह हा केवळ अंत नाही तर पुढील वर्षाच्या प्रतीक्षेला नवी ऊर्जा देणारा आरंभ असतो.

लोकमान्य टिळकांनी या उत्सवाचे महत्त्व ओळखले आणि सार्वजनिक गणेशोत्सव ही परंपरा एकोणीसाव्या शतकात सुरू केली (१८९३). त्यांनी धार्मिक परंपरेला राष्ट्रजागृतीचे साधन बनवले. मंडपांमध्ये राजकीय व्याख्याने, समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण, स्वदेशी यांचे संदेश दिले जात. त्यामुळे गणेशोत्सव हा धार्मिकतेतून राष्ट्रीयतेकडे नेणारा उत्सव ठरला. सार्वजनिक गणेशोत्सव हे सामाजिक एकात्मतेचे जिवंत उदाहरण आहे. मंडळांमध्ये विविध जाती, धर्म, आर्थिक स्तरातील लोक एकत्र येतात. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ सामाजिक सेवा, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत या उपक्रमांसाठी ओळखले जाते.

ग्रामीण भागात गणेशोत्सव गावातील एकता आणि सामूहिक जबाबदारी वाढवतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, गणेशोत्सव सामाजिक भांडवल निर्माण करतो, म्हणजे परस्पर विश्वास, सहकार्य आणि समाजातील ऐक्य वृद्धिंगत करतो. सार्वजनिक गणेशोत्सव हे सामाजिक एकात्मतेचे सर्वात सुंदर उदाहरण आहे. मंडपाची उभारणी, निधीसंकलन, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम या सगळ्या उपक्रमात विविध जाती-धर्म, भाषा, आर्थिक स्तरातील लोक सामील होतात. भजन, कीर्तन, व्याख्याने, समाजोपयोगी उपक्रम यांमधून राष्ट्रप्रेमाची आणि समाजसेवेची भावना जागृत होते. एकत्र काम करण्यामुळे सामाजिक तटबंदी कमी होते आणि बंधुभाव दृढ होतो. ग्रामीण भागात गावोगावी एकाच मंडपात सारे लोक जमतात. शहरांमध्ये सोसायट्या, रस्ते, संस्थांमार्फत मंडळे तयार होतात. भजन, कीर्तन, नाट्यप्रयोग, सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम यामधून समाजजागृती घडते. आजच्या तुटक समाजजीवनात, गणेशोत्सव समाजाला जोडणारा उत्सव ठरतो.

अर्थशास्त्रज्ञांच्या मते गणेशोत्सव स्थानिक उद्योजकता, कारागिरी आणि लघुउद्योग यांना मोठा आधार देतो. उत्सवाचा अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो. मूर्तीकाम, फुलांचा व्यवसाय, मिठाई, सजावट साहित्य, संगीत, प्रकाशयोजना, वाहतूक व्यवस्था यामुळे हजारो लोकांना रोजगार मिळतो. छोटे दुकानदार, कलाकार आणि सेवाक्षेत्राला यामुळे मोठा आधार मिळतो. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा हा खरा लोकोत्सव असतो.

गणेशोत्सव हा भारतीय संस्कृतीचा दीपस्तंभ आहे. तो कुटुंबसंस्था दृढ करतो, समाजात एकता निर्माण करतो, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतो, तत्त्वज्ञान व अध्यात्म शिकवतो आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सांस्कृतिक सेतू उभारतो. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक विधी नसून सनातन धर्माचा गहन संदेश देणारा उत्सव आहे. तो आपल्याला अनित्यतेची जाणीव, मर्यादेचे महत्त्व, संतुलित जीवनाची शिकवण, समाजातील एकतेची गरज आणि अर्थव्यवस्थेतील सहभाग शिकवतो. म्हणूनच गणेशोत्सव हे आपल्या जीवनाचं सुंदर प्रतिबिंब आहे त्यात प्रतीत होतो मर्यादेतला आनंद, श्रद्धेतली शक्ती आणि समाजातली एकता. आधुनिक आव्हानांवर मात करून जर हा उत्सव पर्यावरणपूरक स्वरूपात साजरा केला गेला, तर त्याचे तेज शतकानुशतके भारतीय समाजाला मार्गदर्शन करीत राहील.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४५ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

शिरभावी व ८१ गावांच्या नळ पाणीपुरवठा योजनेवर थकबाकीचे संकट गडद

५७ गावांकडे १ कोटी ६४ लाख इतकी थकबाकी

सांगोला : सांगोला तालुक्याची जीवनदायिनी ठरलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविभागांतर्गत कार्यरत शिरभावी व ८१ गावांच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेवर थकबाकीचे संकट गडद झाले आहे. ऑगस्ट २०२६ अखेर ५७ गावांकडे तब्बल १ कोटी ६४ लाख १२ हजार ५५७ इतकी थकबाकी असून योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनावर ताण निर्माण झाला आहे. सांगोला तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

सध्या सांगोला तालुक्यातील ११ गावांमधील १८ हजार ७३६ नागरिकांना टँकरद्वारे १६ खेपा करून तीन लाख लिटर पाणीपुरवठा करण्यात येत आहे. घेरडी, सोनलवाडी, मानेगाव, आलेगाव, जुजारपूर आणि वाणीचिंचाळे या गावांना नव्याने टँकरने पाणीपुरवठा करण्याचे प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. त्यामुळे आगामी काळात तालुक्यातील पाणीटंचाई आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. शिरभावीसह ८१ गावांना वर्षभर अखंडितपणे पाणीपुरवठा करणारी योजना म्हणून या योजनेचा राज्यात नावलौकिक आहे. पण वेळोवेळी थकबाकीची रक्कम वाढत असल्याने ही योजना आर्थिक संकटात सापडली आहे. अनेक गावांची थकबाकी मोठया प्रमाणावर आहे. दुष्काळी असलेल्या सोलापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळयात देखील वेळेवर पाणीपुरवठा होणारा तालुका म्हणून सांगोला तालुक्याची ओळख आहे. सांगोला तालुक्याची जीवनदायिनी ठरलेली शिरभावी पाणीपुरवठा योजना थकबाकीमुळे आर्थिक संकटात सापडली आहे.

सोलापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यातही वेळेवर पाणीपुरवठा होणारा तालुका अशी सांगोल्याची ओळख या योजनेमुळेच निर्माण झाली. मात्र वाढत्या थकबाकीमुळे योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व नियमित खर्च भागविणे कठीण होत चालले आहे. अनेक गावांची थकबाकी लाखोंच्या घरात पोहोचल्याने प्रशासन चिंतेत आहे.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेतील थकबाकी असलेली गावे पुढीलप्रमाणे - शिरभावी २,६६,३५४, संगेवाडी ७५,३४१, मेथवडे १२,९४,०४२, मेथवडे (माळीवस्ती) २,५८,७९९, देवळे ७५,६९४, मांजरी ९,९९,७४३, बामणी २,८१,७८८, सावे ४,०५,७८५, धायटी १,०८,३१७, चिचोली ३,०६,४०२, हलदहिवडी ७६,३१२, वाकी (शि) २,९५,८९८, शिवणे २,४२,७०१, खिलारवाडी ६३,१९१, महूद २८,८०,५८२, महिम १,८२,६७५, गायगव्हाण१९,८९५, देवकतवाडी २,८४,७६८, खवासपूर ४,५८,०६५, एखतपूर ९५,७११, लोटेवाडी २,४५,४०९, कटफळ ४,५५४, अचकदाणी ३,०२,२१४, लक्ष्मीनगर ५,४७,२११, सोनलवाडी १८१, बागलवाडी ६०, वाकी- नरळे वस्ती ४,७५,३७७, वाकी (घे) ६७७, वाणीचिंचाळे ७२६, आलेगाव२,३०,८२२, घेरडी ९०,३३९, मेडशिंगी २०, वाढेगाव १४,२१,८७१, हबीसेवाडी १,४१,११८, डिकसळ ४,२०७, हंगिरगे १,४६,५४०, लोणविरे २८,९४९, हणमंतगाव १,१४५, कडलास ३२,६५४, आगलावेवाडी २९,३०९, बुरुंगेवाडी ६,५२८, जवळा १,४१,७१६, राजुरी १०२, कारंडेवाडी २,८९,९४६, तरंगेवाडी ७४,८१३, भोपसेवाडी २,८४,२४४, नाझरे ७७,७२५, वझरे ३,९४,६३१, अनकढाळ ४,५१२, अजनाळे १३९, य.मंगेवाडी ९३,८५६, गोडसेवाडी १३,०६३, कमलापूर ३,७०२, अकोला २,७१,८२४, कोळे ७,२७,७१०, बुध्देहाळ २०,०२८, सोमवाडी ९९,६२०, जुजारपूर २,४६,६८७, हायवे कोळा २०,८९८ अशी १ कोटी ५१ लाख ४५ हजार ५७५ रुपयांची थकबाकी आहे. मेथवडे, मांजरी, सावे, चिंचोली, महूद, खवासपूर, लक्ष्मीनगर, वाढेगाव, कोळा, वाकी नरळे वस्ती, जुजारपूर आदी गावे थकबाकीत आघाडीवर असल्याचे चित्र आहे. तर शेतकरी सहकारी सूत गिरणीकडे ६ लाख ४२ हजार २३०, महिला सूत गिरणीकडे २७ हजार ८४२, मंगळवेढा पंचायत समिती २ लाख ८९ हजार २२६, पंढरपूर पंचायत समिती ४३ हजार २००, सांगोला तहसील कार्यालय २ लाख ६४ हजार ४८५ अशी एकूण १२ लाख ६६ हजार ९८३ हजार रुपये इतकी थकबाकी आहे. गावे आणि संस्था मिळून १ कोटी ६४ लाख १२ हजार ५५७ रुपये इतकी थकबाकी आहे. शिरभावी पाणीपुरवठा योजनेतून सांगोला तालुक्यातील य. मंगेवाडी , गायगव्हाण , आलेगाव, आगलावेवाडी, गोडसेवाडी,देवळे, राजापूर, शिवणे, वाकी (शिवणे), अचकदाणी,सोनलवाडी, संगेवाडी,डोंगरगाव, मानेगाव, मेडशिंगी, बुरलेवाडी, वाकी (घेरडी), घेरडी, मेथवडे (माळीवस्ती), एखतपूर, सावे, मेथवडे, लोटेवाडी, सातारकरवस्ती, खवासपूर, हणमंतगाव, बुरंगवाडी, जवळा, वाणीचिंचाळे, राजुरी, अनकढाळ, लक्ष्मीनगर, चिचोली, कमलापूर, बामणी, सोनंद, भोपसेवाडी या ३६ गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सांगोला विद्यामंदिरमध्ये लेझीमच्या तालावर आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहात श्रीं ची दिमाखदार प्रतिष्ठापना

सांगोला : सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये यंदाचा गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात आणि अफाट उत्साहात सुरू झाला आहे. लेझीमचा ताल,टिपरी नृत्य आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात 'श्रीं'ची दिमाखदार प्रतिष्ठापना करण्यात आली. उत्सवाची सुरुवात झपके वाड्यामध्ये झाली,तेथे संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रफुल्लचंद्र झपके यांच्या हस्ते 'श्रीं'ची विधिवत पूजा संपन्न झाली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर अंकलगी,शीलाकाकी झपके, विश्वेश झपके,प्रसाद झपके, संस्था सदस्या मंगलताई कोरी, राजश्री झपके,झपके कुटुंबीय,प्राचार्य चारुदत्त जगताप, सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापिका शुभांगी पवार, इंग्लिश मेडियम मुख्याध्यापिका शिल्पा ढाळे, पूर्व प्राथमिक मुख्याध्यापिका रोहिणी व्हटे,पुजा समिती उन्मेश आटपाडीकर,निलेश जंगम,उत्सव विभाग प्रमुख नरेंद्र होनराव,प्रा.धनाजी चव्हाण, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

पूजेनंतर वाजत-गाजत गणपतीची भव्य मिरवणूक शाळेकडे मार्गस्थ झाली. विद्यालयात पोहोचल्यानंतर प्राचार्य चारूदत्त जगताप यांच्या हस्ते पूजा करून 'श्रीं'ची प्रतिष्ठापना करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्रतिष्ठापनेवेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले टिपरी नृत्य, लेझीम आणि मूकनाट्य सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. आरतीनंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

सांगोला विद्यामंदिरची गणेशोत्सव मिरवणूक संपूर्ण शहराचे आकर्षण ठरली. विद्यामंदिर वाढेगाव नाका - झपकेवाडा - देशपांडे नाकील चौक - कोष्टी गल्ली - मणेरी चौक मारुती मंदिर - जय भवानी चौक - तहसील कार्यालय आणि पुन्हा विद्यामंदिर असा या मिरवणुकीचा मार्ग होता. यात प्रशाला व कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनसीसी विद्यार्थी आणि स्काऊट गाईडच्या पथकांनी हिरिरीने सहभाग घेतला.

गणपती बाप्पाच्या घोषणांच्या निनादात मार्गस्थ झालेली मिरवणूक आणि ठिकठिकाणी सादर झालेल्या लेझीम, टिपरी नृत्य व मूकनाटयाच्या बहारदार प्रात्यक्षिकांनी उपस्थित शहरवासीयांना मंत्रमुग्ध केले.

या सोहळ्यासाठी प्रशालेचे उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे, मकरंद अंकलगी यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी गणेशोत्सव समिती, सांस्कृतिक विभाग आणि उत्सव विभाग व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

जय नृसिंह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा प्रथम वर्षाचा गणेशोत्सव उत्साहात
१४ ते २३ सप्टेंबरदरम्यान विविध कार्यक्रमांची पर्वणी

सांगोला : जय नृसिंह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, लोहार गल्ली, सांगोला यांच्या वतीने प्रथम वर्षाचा गणेशोत्सव यंदा मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात येणार आहे. दि.१४ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणपूरक तसेच मनोरंजनात्मक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणरायाच्या आगमन सोहळ्याने व मूर्ती प्रतिष्ठापनेने उत्सवाचा शुभारंभ झालेला आहे. मंगळवार दि. १५ सप्टेंबर रोजी स्वच्छता अभियान व जनजागृती राबविण्यात आला.

बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' हा मनोरंजनाचा धमाकेदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यास मोठा प्रतिसाद मिळाला.

गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून, 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' या भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाने केले आहे. शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. १९ सप्टेंबर रोजी होणार आहे. या दिवशी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यासोबतच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते श्री गणरायाची आरती करण्यात येणार आहे.

रविवार दि. २० सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी भव्य रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विविध शाळा व संस्थांमधील विद्यार्थी सहभागी होणार असून, विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे तसेच सहभागी विद्यार्थ्यांसाठी लकी ड्रॉ ठेवण्यात आला आहे. सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी महिलांसाठी विशेष कार्यक्रम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे.

दहा दिवसांच्या या उत्साहपूर्ण गणेशोत्सवाची सांगता बुधवार दि. २३ सप्टेंबर रोजी श्री गणरायाच्या भव्य विसर्जन मिरवणुकीने होणार आहे. यंदाचा गणेशोत्सव हा केवळ ढोल-ताशे, सजावट आणि मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता स्वच्छता, रक्तदान, वृक्षारोपण, ज्येष्ठांचा सन्मान, महिला सक्षमीकरण, बालकांच्या कलागुणांना प्रोत्साहन आणि सामाजिक एकोपा यांना प्राधान्य देणारा ठरणार आहे.

लोहार गल्लीच्या गणेशोत्सवाला सांगोला शहरातील सर्व नागरिकांनी आपला उत्सव समजून सहभागी व्हावे आणि या प्रथम वर्षाच्या गणेशोत्सवाला अभूतपूर्व प्रतिसाद द्यावा, असे आवाहन जय नृसिंह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांगोला शहरात पोलिसांचा रूट मार्च

सांगोला : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, यासाठी रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ६.३० वाजेच्या दरम्यान सांगोला शहरातून पोलिसांचा रूट मार्च (पथसंचलन) काढण्यात आला.

सांगोला पोलीस ठाणे येथून रूट मार्चला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सांगोला शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, भीमनगर, वाडेगाव नाका, महादेव गल्ली, गोष्टी गल्ली, मेन रोड, हनुमान मंदिर, जय भवानी चौक, नेहरू चौक, महात्मा फुले चौक मार्गे वासूद चौक येथे रूट मार्चचा समारोप करण्यात आला.

गौंशोत्सव काळात शहरातील प्रमुख मार्ग, गणेश मंडळे तसेच गर्दीच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिसांकडून रूट मार्चच्या माध्यमातून सुरक्षेची पाहणी करण्यात आली. पथसंचलनामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर नागरिकांचे लक्ष वेधले गेले.गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचा संदेश या पथसंचलनातून देण्यात आला. या रूट मार्चमध्ये पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, दंगा काबू पथक तसेच होमगार्ड मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.पोलिसांच्या शिस्तबद्ध गणेशोत्सव काळात नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून शांतता व सुव्यवस्था राखण्यास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी केले.

मा.आ.शहाजीबापू पाटील सोशल मंचच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप

सांगोला : मा.आ. शहाजीबापू पाटील सोशल मंचच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप करण्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मा.आ. शहाजीबापू पाटील यांच्या उपस्थितीत तसेच मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास विद्यमान नगराध्यक्ष श्री.आनंदाभाऊ माने, युवासेना जिल्हा संपर्कप्रमुख श्री. सागरदादा पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य श्री.दादासाहेब लवटे, पंचायत समिती उपसभापती श्री. अजय सरगर, पंचायत समिती सदस्य श्री. उमेश पाटील, श्री.जगदीश पाटील, नगरसेवक अरुण पाटील, नगरसेवक बबलू पाटील, नगरसेवक सोमेश यावलकर, नगरसेवक काशीलींग गावडे, उद्योगपती अच्युतराव फुले, उद्योगपती बाळासाहेब आसबे, युवासेना तालुकाप्रमुख गुंडादादा खटकाळे, युवासेना संपर्कप्रमुख उदय घाडगे, श्री.प्रताप पाटील, श्री.रवि मेटकरी, श्री. सत्यवान मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मा.आ. शहाजीबापू पाटील सोशल मंचचे संस्थापक अध्यक्ष बापू घायतिडक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शिवसेना, युवासेना व विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी मंचाच्या माध्यमातून संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबवून सामाजिक व जनहिताच्या उपक्रमांना चालना देण्याचा निर्धार व्यक्त केला.

सिद्धनाथ गणेश तरुण मंडळातर्फे विविध भव्य स्पर्धा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन

सांगोला : गणेशोत्सवाच्या निमित्ताने सिद्धनाथ गणेश तरुण मंडळातर्फे यंदाही धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल आयोजित करण्यात आली असून महिलांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण, रक्तदान शिबिर, रंगभरण व चित्रकला स्पर्धा, वृक्षारोपण तसेच श्री गणेश विसर्जन मिरवणुकीसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ सप्टेंबर रोजी महिलांसाठी सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक आरती होऊन उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

१९ सप्टेंबर रोजी सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

२० सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांमधून लकी ड्रॉ काढण्यात येणार असून, लकी ड्रॉच्या विजेत्यास आकर्षक सायकल भेट देण्यात येणार आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांसाठी विविध गट करण्यात आले असून इयत्ता १ ली व २ री, इयत्ता ३ री व ४ थी, इयत्ता ५ वी ते ७ वी आणि इयत्ता ८ वी ते १० वी अशा गटांमध्ये रंगभरण स्पर्धा घेण्यात येणार आहे.

२१ सप्टेंबर रोजी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. तर २३ सप्टेंबर रोजी श्री गणेशाच्या विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भक्तिमय वातावरणात व उत्साहात गणरायाला निरोप देण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : तन्मय खडतरे ८२३७९१००००, अजिंक्य घोंगडे : ९७६६४९५०५०, सुमित कोठावळे : ९९६०८९११४४ व सुयोग घोंगडे : ९७६६८९४१४३ यांच्याशी संपर्क साधावा.

या सर्व कार्यक्रमांना

नागरिकांनी व गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवहान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.